जा.क्र./मनपा/आस्था-१/२०२४/८८९
छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका
दिनांक :- १४/०३/२०२४.

**कार्यालयीन परिपत्रक :-**

महानगरपालिकेच्या अधिकारी व कर्मचारी यांनी कार्यालयीन वेळेत महानगरपालिकेचे ओळखपत्र धारण करणे आवश्यक आहे. परंतु त्याचे पालन होत नसल्याचे दिसून आले आहे. ही बाब योग्य नाही. तसेच ओळखपत्रामध्ये समानता दिसून येत नाही.

करीता या परिपत्रकान्वये छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेतील सर्व अधिकारी व कर्मचारी यांना सूचित करण्यात येते की, कार्यालयीन वेळेत महानगरपालिकेचे ओळखपत्र धारण करणे अनिवार्य असल्याने ते नियमितपणे धारण करावे.

तसेच मध्यवर्ती भांडार विभागास ओळखपत्राचा नमुना देण्यात येत असून सदर नमुन्याप्रमाणे मध्यवर्ती भांडार विभागाने ओळखपत्र छपाई करुन घेऊन सर्व अधिकारी व कर्मचारी यांना उपलब्ध करुन द्यावे.

आयुक्त तथा प्रशासक
छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

प्रति,

सर्व विभाग प्रमुख/शाखा प्रमुख, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांनी सदरचे परिपत्रक त्यांचे अधिनस्त सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे निदर्शनास आणून द्यावे.

Scanned with OKEN Scanner